Government of Maharashtra
Maharashtra Academic Authority
Sadashiv Peth, Kumthekar Road,
Pune 411030
Tel. No. : (020)24476938,24475571
Website : www.maa.ac.in
E-Mail : preserviceedudept@maa.ac.in

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र विद्या प्राधिकरण
सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे ४११०३०
दु.क्र. (०२०) 24476938, 24475571
वेबसाईट : www.maa.ac.in
ईमेल: preserviceedudept@maa.ac.in

जा.क्र. विप्रा/सेवापूर्व शिक्षण/२०१८/ 2586 दिनांक : ४.६.२०१८

**तातडीचे/ कालमर्यादित**

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)

**विषयः- डी.एल.एड. प्रथम वर्ष २०१८-१९ व्यवस्थापन कोटयाबाबत....**

उपरोक्त विषयाबाबत अध्यापक विद्यालयांचे व्यवस्थापन कोटयाचे प्रवेश हे शासकीय कोटा प्रवेशावेळी समांतर पध्दतीने होतील. याबाबतची नियमावली विद्या प्राधिकरणाचे www.maa.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**डी.एल.एड. प्रथम वर्ष २०१८-१९ व्यवस्थापन कोटयाबाबत पुढील वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी.**

१. संबंधित अध्यापक विद्यालयानी व्यवस्थापन कोटयाची प्रवेश प्रक्रिया **दि. ४ जून २०१८ ते १६ जुलै २०१८ पर्यंत** अध्यापक विद्यालयांनी प्रचलित नियमानुसार करावी.
२. अध्यापक विद्यालयानी व्यवस्थापन कोटा प्रवेशाचे मान्यतेबाबतचे प्रस्ताव संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे **दि. १३ जुलै २०१८ पर्यंत** सादर करावेत. त्यानंतर आलेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.
३. तसेच संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी **दि. १५ जुलै २०१८ पर्यंत** प्राप्त प्रस्तावावर निर्णय घेऊन संबंधितांना कळविणे.
४. तसेच मंजूर व्यवस्थापन कोटयाची माहिती **अध्यापक विद्यालयांनी दि. १ जुलै २०१८ ते १५ जुलै २०१८** या कालावधीत विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेमार्फत **ऑनलाईन** भरावी.
५. **विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी दिनांक १ जुलै २०१८ ते १६ जुलै २०१८** या कालावधीत व्यवस्थापन कोटा मंजूर प्रवेशाची ऑनलाईन माहिती प्रमाणित करुन द्यावी.
६. माहिती ऑनलाईन न भरल्यास, विद्यार्थ्यांस ऑनलाईन ॲडमिट न केल्यास व विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास यांची जबाबदारी संबंधित प्राचार्य, अध्यापक विद्यालय यांच्यावर राहील.
७. अध्यापक विद्यालय सुरु करणे दिनांक १६ जुलै २०१८
८. दि. १६ जुलै २०१८ नंतर डी.एल.एड. प्रवेशाची लिंक चालू राहणार नाही याची नोंद घ्यावी.

याबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील संबंधित प्राचार्यांना सक्त सूचना देण्याची कार्यवाही करावी.

**अध्यापक विद्यालयांनी वेळेत प्रस्ताव सादर करावेत व विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी ठरवून दिलेल्या कालमर्यादेत त्यास मान्यता द्यावी. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याबाबत आपल्या स्तरावरुन कार्यवाही होण्याची अध्यापक विद्यालयांना सक्त सूचना द्याव्यात. मात्र विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या नावाखाली अध्यापक विद्यालयाच्या बेशिस्तीस पाठीशी घातल्यास याबाबत नियमानुसार अध्यापक विद्यालयांवर विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेमार्फत कारवाई करण्यात येईल.**

**तसेच वेळेत व्यवस्थापन कोटा प्रस्तावास मान्यता न देणाऱ्या विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्यावरही शासनाकडे कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.**

(एन.पी. शेंडकर)
उपसंचालक (सेवापूर्व शिक्षण)
महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे ३०